सोमवार दि. २८ सप्टेंबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक २७ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282



### जालन्याच्या सोनू जोशींची १५५० किमी पदयात्रा पूर्ण

## खाटूश्यामजीच्या चरणी संकल्पपूर्ती

### देशकल्याणाचा संकल्प घेऊन आता जालन्याकडे परतीची वाटचाल

**जालना । प्रतिनिधी**

देशाची सुख-शांती, समृद्धी, सामाजिक सद्भाव, राष्ट्रीय एकता आणि जनकल्याणाची मंगलकामना मनाशी बाळगून जालना शहरातून सुरू झालेल्या सोनू महाराज जोशी यांच्या सुमारे १५५० किलोमीटरच्या पदयात्रेची खाटूश्यामजी येथे संकल्पपूर्ती झाली आहे. १५ ऑगस्ट २०२६ रोजी जालना शहरातील गायत्री नगरातून हातात धर्मध्वज घेऊन सुरू झालेला हा प्रदीर्घ पायी प्रवास महाराष्ट्रातून गुजरातमार्गे राजस्थानातील बाबा रामदेवरा, सालासर बालाजी आणि अखेर खाटूश्यामजी या प्रमुख धार्मिक स्थळांपर्यंत पोहोचला. आता दर्शन आणि संकल्पपूर्ती झाल्यानंतर सोनू जोशी जालन्याकडे पायी परतीच्या प्रवासाला सुरुवात करणार आहेत.

तब्बल दीड हजार किलोमीटरहून अधिक अंतराचा हा प्रवास करताना त्यांनी ऊन, पाऊस, बदलते हवामान, लांबचा रस्ता, शारीरिक थकवा आणि विविध




**पदयात्रेचा प्रवास एका नजरेत**

- पदयात्रेचा प्रारंभ : १५ ऑगस्ट २०२६
- प्रारंभस्थळ : गायत्री नगर, जालना
- एकूण प्रवास : जवळपास १५५० किलोमीटर
- प्रवासाची पद्धत : पायी
- प्रमुख मार्ग/टप्पे : जालना गुजरात राजस्थान रामदेवरा सालासर बालाजी खाटूश्यामजी
- प्रमुख दर्शन : बाबा रामदेवजी, सालासर बालाजी, खाटूश्यामजी
- सध्याची स्थिती : खाटूश्यामजी येथे पदयात्रेची संकल्पपूर्ती
- पुढील टप्पा : खाटूश्यामजीहून जालन्याकडे परतीचा प्रवास

अडचणींचा सामना केला. मात्र मनातील संकल्प, श्रद्धा आणि देशकल्याणाची भावना कायम ठेवत त्यांनी ही पदयात्रा पूर्ण केली. त्यामुळे जालन्यातून सुरू झालेल्या या यात्रेचा राजस्थानातील खाटूश्यामजी येथे झालेला समारोप हा त्यांच्या दृष्टीने श्रद्धा, जिद्द आणि सातत्याचा महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. १५ ऑगस्ट २०२६ रोजी जालना शहरातील गायत्री नगरातून सोनू महाराज जोशी यांनी या पदयात्रेला प्रारंभ केला. कोणताही मोठा लवाजमा किंवा तामझाम न करता हातात धर्मध्वज घेऊन (पान २ वर)

## मोटारसायकल चोरीच्या टोळीचा पर्दाफाश; दोन आरोपी जेरबंद

### शिर्डीतून दोघांना ताब्यात घेतल्यानंतर चोरीच्या १० दुचाकी जप्त; जालना, छत्रपती संभाजीनगर व परभणीतील ८ गुन्हे उघडकीस

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यासह परिसरात मोटारसायकल चोरीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत दोन संशयित आरोपींना शिर्डी येथून ताब्यात घेतले आहे. पोलिसांच्या चौकशीत त्यांनी आणखी एका साथीदाराच्या मदतीने जालना शहरासह छत्रपती संभाजीनगर आणि परभणी जिल्ह्यात विविध ठिकाणांहून मोटारसायकली चोरी केल्याची माहिती



समोर आली आहे. या कारवाईत पोलिसांनी विविध कंपन्यांच्या तब्बल १० मोटारसायकली जप्त केल्या असून त्यांची एकूण किंमत सुमारे ४ लाख ३० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या कारवाईमुळे मोटारसायकल चोरीचे एकूण आठ गुन्हे उघडकीस आणण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पानशेंद्रा येथील संतोष भाऊराव पाचरणे यांची शाईन मोटारसायकल ११ ऑगस्ट २०२६ रोजी कणकेश्वर मंदिर परिसरातून अज्ञात चोरट्याने चोरून नेली होती. याप्रकरणी तालुका जालना पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५८९/२०२६, कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. मोटारसायकल चोरीच्या या गुन्ह्याचा तपास सुरू असताना चोरीची मोटारसायकल शिर्डी परिसरातील गणेश ऊर्फ संतोष शंकर शिंदे आणि सौरभ विक्की रोजझारिओ या व्यक्तींनी चोरल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली. मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने २६ सप्टेंबर २०२६ रोजी शिर्डी, जि. अहिल्यानगर येथे कारवाई करून गणेश ऊर्फ संतोष शंकर शिंदे (रा. कालिकानगर, शिर्डी) आणि सौरभ विक्की रोजझारिओ (रा. शिर्डी) या (पान २ वर)

## गणेशोत्सवात सलग सहा दिवस शिबिर; १३० मधुमेहग्रस्त तर २१० जण प्रीडायबेटिक आढळले

**जालना - प्रतिनिधी**

मधुमेहाचे तात्काळ निदान व्हावे आणि गुंतागुंत निर्माण होण्यापूर्वीच उपचार सुरू करता यावेत, यादृष्टीने सौ. जमनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्ट आणि रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्यावतीने गणेशोत्सवानिमित्त बडीसडकवर गणेश भक्तांसाठी आयोजित सहादिवशीय मोफत मधुमेह निदान शिबिरात २०७८ जणांनी सहभाग नोंदविला. त्यापैकी १३० जणांना मधुमेह असल्याचे तर २१० जण प्रीडायबेटिक असल्याचे निदान झाले, अशी माहिती मधुमेह तज्ञ डॉ. राजेश सेठिया यांनी दिली.

गणेशोत्सव काळात बडीसडकवर गणेश भक्तांची गणपती पाहण्यासाठी मोठी गर्दी असते. त्या अनुषंगाने १९ ते २४ सप्टेंबरदरम्यान दररोज रात्री ७ ते १२ या वेळेत रुबी हॉस्पिटलसमोर हे शिबिर घेण्यात आले. शिबिराच्या शुभारंभप्रसंगी सौ. जमनाबाई शिवरतनजी बगडिया (पान २ वर)

## गोवंशाच्या मांसाची वाहतूक करणाऱ्या वाहनाचा मालक कारवाईपासून वाचू शकत नाहीः उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

**जालना - प्रतिनिधी**

गोवंशाचे मांस (बीफ) जप्त करण्यात आले त्यावेळी जर वाहनाचा मालक स्वतः त्या वाहनातून प्रवास करत असेल, तर 'हे मांस भाड्याने घेतलेल्या प्रवाशांचे होते' असा बचाव करून तो वाहन जप्तीची कारवाई टाळू शकत नाही, असा अत्यंत महत्त्वपूर्ण आणि कठोर निकाल अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायमूर्ती संदीप जैन यांच्या एकलपीठाने स्पष्ट केले की, न्यायवैद्यक प्रयोगशाळेने जप्त केलेले मांस गोमांस असल्याचे सिद्ध केल्यानंतर उत्तर प्रदेश गोवंश वध प्रतिबंधक कायदा, १९५५ च्या कलम ५-ए(१०) नुसार संबंधित व्यक्तीविरुद्ध थेट कायदेशीर गृहीतक ( ) लागू होते. हे गृहीतक खोडून काढण्यासाठी मालकालाच सबळ पुरावे सादर करावे लागतील. संतकबीर नगर जिल्ह्यातील खलीलाबाद येथे गोपनीय माहितीच्या आधारे याचिकाकर्त्याच्या बजाज ऑटो रिक्षावर कारवाई करण्यात आली होती. या तपासणीदरम्यान वाहनातून चार गोण्यांमध्ये भरलेले तब्बल ८० किलो गोमांस आणि याचिकाकर्ता मोहम्मद जलालुद्दीन व त्याच्यासोबत प्रवास करणारा फय्याज या दोघांकडून प्रत्येकी एक सुरा जप्त करण्यात आला होता. या प्रकरणी संतकबीर नगर जिल्हाधिकाऱ्यांनी हे वाहन जप्त करून राज्य सरकारच्या स्वाधीन करण्याचे आदेश दिले होते, ज्याविरोधात केलेली पुनर्निरीक्षण याचिका बस्ती विभागाच्या आयुक्तांनी फेटाळली होती. या दोन्ही आदेशांना याचिकाकर्त्याने उच्च न्यायालयात रिट याचिकेद्वारे आव्हान दिले होते. याचिकाकर्त्याने असा युक्तिवाद केला होता की, त्याने हे वाहन प्रवाशांची वाहतूक करून उपजीविका चालवण्यासाठी घेतले होते आणि तीन प्रवाशांनी भाड्याने घेतलेल्या ऑटोमध्ये त्याच्या संमतीशिवाय हे मांस आणले होते. त्यामुळे गुन्हेगारी हेतू ( ) नसल्याने वाहन जप्तीची कारवाई बेकायदेशीर असल्याचा दावा करण्यात आला. मात्र, सरकारी वकिलांनी याचिकाकर्ता स्वतः घटनास्थळी उपस्थित असल्याने कायद्यानुसार (पान २ वर)

## पोषण व अन्नसुरक्षा जनजागृतीसाठी विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा-कुलकर्णी

### आयसीटीच्या जालन्यातील मराठवाडा कॅम्पसमध्ये न्यूट्रीफिएस्टा उपक्रमाला सुरुवात

**जालना- प्रतिनिधी**

निरोगी समाजासाठी योग्य पोषण अत्यंत महत्त्वाचे आहे. पोषण आणि अन्नसुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनातून पुढाकार घेत समाजापर्यंत योग्य संदेश पोहोचवावा, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाचे सहआयुक्त निखिल सूर्यकांत कुलकर्णी यांनी केले.



इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी मुंबईच्या मराठवाडा कॅम्पस, जालना येथे सप्टेंबर महिन्यातील पोषणविषयक जनजागृतीच्या अनुषंगाने डिस्कवर द पावर ऑफ न्यूट्रिशन'या संकल्पनेवर आधारित 'न्यूट्रीफिएस्टा ६.०' या विशेष उपक्रमाचे उद्घाटन बुधवार, दि. २३ सप्टेंबर रोजी श्री. कुलकर्णी यांच्या हस्ते झाले, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांनी पोषणविषयक जनजागृतीची गरज अधोरेखित करत (पान २ वर)

## फॉल्टी मीटर बदलून देण्यासाठी १३ हजार रुपयांची लाच घेताना महावितरणचा वरिष्ठ तंत्रज्ञ जाळ्यात

**राजूर - प्रतिनिधी**

महावितरण कंपनीतील परळी वैजनाथ (जि. बीड) येथे कार्यरत असलेल्या एका वरिष्ठ तंत्रज्ञाला (अतिरिक्त कार्यकारी अभियंता) तक्रारदाराकडून १३ हजार रुपयांची लाच घेताना



लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (), जालना यांच्या पथकाने रंगेहाथ पकडले. अरुण सुरेश गिते (वय ३१, रा. नागरगोजे यांच्या घरी किराण्याने, माऊली नगर, परळी) असे लाचखोर कर्मचाऱ्याचे नाव आहे. तक्रारदार (वय ५० वर्ष, रा. जालना) हे खाजगी नोकरी करतात. २५ सप्टेंबर २०२६ रोजी अरुण गिते यांनी तक्रारदाराच्या घरचे विद्युत मीटर वीज कट करून काढून नेले होते. तक्रारदाराने महावितरण कार्यालयात जाऊन विचारणा केली असता, गिते यांनी ''तुमचे विद्युत मीटर फॉल्टी आहे, ते नवीन बसवून विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी १५ हजार रुपये द्यावे लागतील'' अशी मागणी केली. लाच देण्याची (पान २ वर)

## घोषणांचा पाऊस, शेतकऱ्यांची झोळी मात्र रिकामी; वरफळमध्ये आदित्य ठाकरेंचा सरकारवर घणाघात

**परतूर - प्रतिनिधी**

''राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये शासनाने दुष्काळ जाहीर केला असला, तरी बळीराजाच्या हाती प्रत्यक्ष मदत शून्य आहे. केवळ कागदावर घोषणांचा पाऊस पाडून सरकार जनतेची दिशाभूल करत आहे. मागच्या वर्षी जाहीर केलेले अतिवृष्टीचे ३२ हजार कोटींचे पॅकेज कुठे गेले? आणि जलयुक्त शिवार योजनेवर खर्च झालेले १२ हजार कोटी नेमके कुठे जिरले?



निवडणुका संपताच ९५ लाख लाडक्या बहिणींना योजनेतून बाहेर काढून वाऱ्यावर सोडणाऱ्या या लबाड सरकारने शेतकऱ्यांनाही वाऱ्यावर सोडले आहे,'' असा संतप्त सवाल करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार व युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. परतूर तालुक्यातील वरफळ येथील शेतकरी आयोध्या (पान २ वर)

# संपादकीय...

## जालन्याच्या गणेश विसर्जनातून समन्वयाचे दर्शन

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नाही; तो शहराच्या सामाजिक एकजुटीची, शिस्तीची आणि प्रशासनाच्या कार्यक्षमतेचीही परीक्षा असतो. हजारो नागरिक एकाच वेळी रस्त्यावर येतात, शेकडो गणेश मंडळांच्या मिरवणुका निघतात, वाहतूक वाढते, विसर्जनस्थळी प्रचंड गर्दी होते आणि त्याच वेळी स्वच्छता, आरोग्य, सुरक्षा, आपत्कालीन व्यवस्था आणि पर्यावरणाचा समतोल राखण्याचे आव्हान प्रशासनासमोर उभे राहते. जालना शहरातील यंदाच्या गणेश विसर्जन सोहळ्याने या सर्व आव्हानांचा मोठ्या प्रमाणावर सामना केला. ५१९ सार्वजनिक गणेश मंडळे आणि अंदाजे ७० ते ८० हजार घरगुती व व्यावसायिक गणेशमूर्तींचे विसर्जन, जवळपास २४ तास सुरू असलेल्या मिरवणुका आणि तब्बल ३४ तास कार्यरत असलेली यंत्रणा ही आकडेवारीच या व्यवस्थेची व्याप्ती स्पष्ट करते. गणरायाला भावपूर्ण निरोप देताना जालना शहराने केवळ उत्सव साजरा केला नाही, तर प्रशासन, गणेश मंडळे, स्वयंसेवक आणि नागरिक यांच्या समन्वयातून मोठी व्यवस्था कशी हाताळता येते, याचेही उदाहरण निर्माण केले. यश केवळ मनपाचे किंवा पोलिसांचे नाही; प्रत्येक हाताचा वाटा आहे. विसर्जन व्यवस्था सुरळीत पार पडली म्हणून त्याचे श्रेय केवळ महापालिका किंवा पोलिस प्रशासनाला देणेही पूर्ण चित्र ठरणार नाही. महापालिकेचे अधिकारी-कर्मचारी, पोलीस, होमगार्ड, महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे कर्मचारी, आरोग्य विभाग, जीव रक्षक दल, स्वच्छता कर्मचारी, सामाजिक संस्था, स्वयंसेवक, गणेश मंडळांचे कार्यकर्ते आणि सामान्य नागरिकया प्रत्येक घटकाच्या सहभागातून ही व्यवस्था उभी राहिली.

महापालिका आयुक्त अंजली शर्मा आणि पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधू यांच्या मार्गदर्शनाखाली विविध यंत्रणांमध्ये समन्वय ठेवण्यात आला. वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी प्रत्यक्ष रस्त्यावर तसेच विसर्जनस्थळी कार्यरत होते. अशा मोठ्या धार्मिक-सामाजिक कार्यक्रमात 'मी माझे काम केले' एवढ्याने व्यवस्था चालत नाही; एकमेकांच्या कामाशी समन्वय साधणे हाच यशाचा मुख्य आधार असतो.

यंदाच्या विसर्जन प्रक्रियेत हा समन्वय दिसून आला, हे विशेषत्वाने नोंदवावे लागेल.

२५ सप्टेंबरच्या सकाळपासून सुरू झालेली विसर्जन प्रक्रिया २६ सप्टेंबरच्या सायंकाळी ६.२० वाजेपर्यंत सुरू होती. म्हणजेच ही केवळ काही तासांची व्यवस्था नव्हती. ३४ तास सातत्याने मनुष्यबळ, वाहतूक नियंत्रण, सुरक्षा, स्वच्छता, आरोग्य, मूर्ती हाताळणी आणि आपत्कालीन यंत्रणा सक्रिय ठेवणे ही मोठी जबाबदारी होती.

मोठ्या मूर्तींसाठी सहा क्रेन, घरगुती गणेशमूर्तींसाठी दहा कृत्रिम विसर्जन कुंड आणि मूर्तीदानासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली. या सुविधांमुळे मुख्य विसर्जनस्थळी येणारा ताण कमी करण्याचा प्रयत्न झाला.

ही बाब केवळ व्यवस्थापन म्हणून न पाहता भविष्यातील नियोजनासाठी अनुभव म्हणून पाहणे आवश्यक आहे.

गणेश विसर्जनाच्या काळात शहरातील रस्ते म्हणजे एक प्रकारे मोठे सार्वजनिक व्यासपीठ बनतात. ढोल-ताशे, पारंपरिक वाद्ये, मिरवणुका, भाविकांची गर्दी आणि वाहनांची मोठी संख्या यामुळे वाहतूक नियंत्रण हे स्वतंत्र आव्हान असते.

अशा परिस्थितीत पोलिसांनी केलेला बंदोबस्त आणि गर्दी व्यवस्थापन महत्त्वाचे ठरते. वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून ते रस्त्यावर तैनात असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांपर्यंत अनेकांनी दीर्घकाळ काम केले. संवेदनशील ठिकाणी लक्ष ठेवणे, मिरवणुकीचा प्रवाह नियंत्रित करणे आणि अनुचित प्रकार टाळण्यासाठी सतर्क राहणे ही जबाबदारी सोपी नव्हती. शांततेत उत्सव पार पडतो तेव्हा त्यामागे अनेकदा दिसत नसलेल्या पोलिस आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांची मोठी मेहनत असते. जालना शहराने या योगदानाची दखल घेणे आवश्यक आहे. स्वच्छता कर्मचाऱ्यांचे योगदान विसरता कामा नये गणेश विसर्जन संपल्यानंतर खरी दुसरी परीक्षा सुरू होते. शहर स्वच्छ करण्याची. हजारो नागरिकांच्या उपस्थितीत मिरवणुका पार पडल्या की रस्त्यांवर निर्माल्य, प्लास्टिक, खाद्यपदार्थांचे अवशेष आणि इतर कचरा जमा होतो. विसर्जनस्थळाची स्वच्छता, कचरा संकलन आणि परिसर पूर्ववत करण्याचे काम करणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांचे योगदान त्यामुळे अत्यंत महत्त्वाचे आहे.

गणेशोत्सवाच्या उत्साहात पुढे असलेले चेहरे आपल्याला दिसतात; मात्र उत्सव संपल्यानंतर शहर स्वच्छ करणारे कर्मचारी अनेकदा पडद्यामागे राहतात. जालनावासीयांनी या कर्मचाऱ्यांचेही मनापासून अभिनंदन करायला हवे. विसर्जनस्थळी पाण्याशी संबंधित धोका लक्षात घेता जीव रक्षक दलाची उपस्थिती अत्यावश्यक असते. त्याचबरोबर आरोग्य विभागाची पथके आपत्कालीन परिस्थितीसाठी सज्ज ठेवणे हीदेखील महत्त्वाची बाब आहे. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, माऊली प्रतिष्ठान आणि इतर सामाजिक संस्थांच्या स्वयंसेवकांनी प्रशासनाला सहकार्य केले. गर्दीतील नागरिकांना मार्गदर्शन करणे, मूर्तीदानासाठी सहकार्य करणे आणि विविध ठिकाणी व्यवस्था सांभाळणे, ही कामे प्रशासनावरील ताण कमी करणारी ठरतात. प्रशासन आणि समाज एकमेकांचे पर्याय नाहीत; ते एकमेकांचे सहकारी आहेत. गणेश विसर्जनाने ही बाब पुन्हा अधोरेखित केली. यंदा ५१९ सार्वजनिक गणेश मंडळे आणि ७० ते ८० हजार घरगुती व व्यावसायिक गणेशमूर्तींचे विसर्जन झाले, अशी माहिती देण्यात आली आहे. एवढ्या मोठ्या संख्येचा विचार करता पुढील वर्षी नियोजन करताना यंदाच्या अनुभवाचे दस्तऐवजीकरण होणे गरजेचे आहे.कोणत्या मार्गावर किती गर्दी झाली? कोणत्या वेळेत विसर्जनाचा ताण वाढला? कृत्रिम कुंडांचा वापर किती झाला? मूर्तीदानाला किती प्रतिसाद मिळाला? कोणत्या ठिकाणी वाहतुकीचा ताण जाणवला? कोणत्या व्यवस्थेत सुधारणा आवश्यक आहे? या प्रश्नांची नोंद करून 'गणेश विसर्जन व्यवस्थापन अहवाल' तयार केला तर पुढील वर्षी नियोजन आणखी शास्त्रीय पद्धतीने करता येईल. उत्सव संपला म्हणून नियोजन संपायला नको; उत्सवातून मिळालेला अनुभव पुढील वर्षाच्या नियोजनाची सुरुवात असायला हवा. महापालिकेने कृत्रिम विसर्जन कुंड आणि मूर्तीदानाची व्यवस्था केली, ही सकारात्मक बाब आहे.

# पान १ वरुन...

### खाटूश्यामजीच्या...

त्यांनी पायी प्रवास सुरू केला. जालन्यातून निघाल्यानंतर विविध टप्पे पार करत त्यांची पदयात्रा गुजरातमध्ये पोहोचली. त्यानंतर राजस्थानात प्रवेश केल्यानंतर त्यांनी बाबा रामदेवरा येथे जाऊन बाबा रामदेवजींचे दर्शन घेतले. तेथून पुढे सालासर बालाजी येथे पोहोचून दर्शन घेतल्यानंतर अखेर खाटूश्यामजी येथे त्यांनी आपली पदयात्रा पूर्ण केली.

अशा प्रकारे जालना ते गुजरात, रामदेवरा, सालासर बालाजी आणि खाटूश्यामजी असा जवळपास १५५० किलोमीटरचा प्रदीर्घ पायी प्रवास त्यांनी पूर्ण केला आहे.

ही पदयात्रा केवळ धार्मिक दर्शनासाठी नसून देशकल्याणाची भावना मनात ठेवून सुरू केल्याचे सोनू जोशी यांनी यापूर्वी स्पष्ट केले आहे. देशातील प्रत्येक नागरिकाच्या जीवनात सुख-शांती नांदावी, प्रत्येक कुटुंबात समृद्धी यावी, समाजात बंधुभाव आणि सामाजिक सद्भाव वाढावा, राष्ट्रीय एकता अधिक मजबूत व्हावी आणि भारत देश प्रगतीच्या मार्गावर पुढे जावा, अशी भावना त्यांनी या यात्रेत व्यक्त केली.

सोनू जोशी म्हणाले, ''ही यात्रा केवळ एक धार्मिक उपक्रम नसून भारतवर्षाच्या कल्याणासाठी, सामाजिक सद्भाव, राष्ट्रीय एकता आणि मानवतेच्या सेवेसाठी घेतलेला भावनिक संकल्प आहे. देशातील प्रत्येक नागरिकाच्या जीवनात सुख-शांती यावी, प्रत्येक परिवारात खुशहाली राहावी आणि भारत देश निरंतर प्रगतीच्या पथावर पुढे जावा, हीच बाबा रामदेवजी आणि खाटूश्यामजींच्या चरणी प्रार्थना आहे.'' राजस्थानातील धार्मिक प्रवासात बाबा रामदेवरा येथे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी पुढील प्रवास सुरू ठेवला. त्यानंतर सालासर बालाजी येथे पोहोचून बालाजीचे दर्शन घेतले. या दोन्ही तीर्थक्षेत्रांनंतर त्यांच्या यात्रेचा अंतिम धार्मिक टप्पा असलेल्या खाटूश्यामजी येथे ते पोहोचले. खाटूश्यामजीच्या दर्शनाने जालना येथून सुरू केलेल्या सुमारे १५५० किलोमीटरच्या पायी यात्रेचा संकल्प पूर्ण झाला. त्यामुळे अनेक दिवसांच्या खडतर प्रवासानंतर धार्मिक स्थळांच्या दर्शनाची सांगता आणि मूळ संकल्पाची पूर्तता अशा दोन्ही भावना या टप्प्यावर एकत्र आल्या. संपूर्ण प्रवासात सोनू जोशी यांनी कोणताही मोठा तामझाम न करता हातात धर्मध्वज घेऊन पायी वाटचाल केली. प्रवासात अनेक अडचणी आल्या; मात्र विविध ठिकाणी नागरिक, भाविक आणि स्थानिकांनी केलेले स्वागत, दिलेले आशीर्वाद आणि शुभेच्छा यामुळे पुढे जाण्याचे बळ मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रातून गुजरात आणि त्यानंतर राजस्थानातील विविध भागांतून प्रवास करताना अनेक नागरिकांशी त्यांचा संपर्क आला. ठिकठिकाणी नागरिकांनी त्यांचे स्वागत केले. काही ठिकाणी पुष्पहार, दुपट्टा आणि आशीर्वाद देत त्यांच्या संकल्पाला शुभेच्छा देण्यात आल्या. ''रस्त्यात अनेक अडचणी आल्या; मात्र प्रत्येक ठिकाणी नागरिकांनी दिलेले प्रेम, भाविकांचे आशीर्वाद आणि देशकल्याणाचा मनातील संकल्प यामुळे पुढे चालण्याची नवी ऊर्जा मिळत राहिली,'' अशी भावना सोनू जोशी यांनी व्यक्त केली.

१५५० किलोमीटरचा प्रदीर्घ प्रवास पूर्ण झाल्यानंतर आता सोनू जोशी यांच्या यात्रेचा पुढील टप्पा सुरू होणार आहे. खाटूश्यामजीचे दर्शन घेतल्यानंतर ते पुन्हा जालन्याकडे पायी परतण्याचा संकल्प घेऊन मार्गस्थ होणार आहेत.

म्हणजेच जालन्यातून सुरू झालेली ही यात्रा केवळ राजस्थानातील धार्मिक स्थळांपर्यंत पोहोचून संपलेली नाही. मूळ संकल्पानुसार धार्मिक दर्शन पूर्ण केल्यानंतर आता जालन्याकडे परतीची पायी वाटचालही सुरू होणार आहे. त्यामुळे त्यांच्या या प्रवासात आणखी मोठ्या अंतराची भर पडणार आहे. जालन्यातून निघताना ज्या भावनेने त्यांनी पदयात्रेला सुरुवात केली, त्याच भावनेने परतीचा प्रवास पूर्ण करून आपल्या शहरात पोहोचण्याचा त्यांचा मानस आहे. सोनू महाराज जोशी यांचा धार्मिक प्रवास यापूर्वीपासूनच सातत्यपूर्ण राहिला आहे. २०११ ते २०२४ या कालावधीत त्यांनी जोधपूर ते रामदेवरा अशी सुमारे २१० किलोमीटरची पदयात्रा केली असल्याची माहिती आहे. त्यानंतर २०२५ मध्ये जालना ते मध्य प्रदेश, गुजरात, हरियाणा आणि राजस्थान असा सुमारे ३१०० किलोमीटरचा मोटारसायकल प्रवास अवघ्या सात दिवसांत पूर्ण केल्याचे सांगण्यात आले आहे.

धार्मिक श्रद्धेसोबतच समाजसेवेची भावना जपत फेब्रुवारी २०२६ मध्ये एका गरजू कुटुंबातील कन्येच्या विवाहाचा संपूर्ण खर्च उचलून कन्यादानाची जबाबदारी त्यांनी पार पाडल्याची माहिती आहे. तसेच ऑगस्ट २०२५ ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत सांवलिया सेठ, सालासर बालाजी, खाटूश्यामजी आणि बाबा रामदेवरा या तीर्थक्षेत्रांना नियमित दर्शनासाठी भेट दिल्याचेही सांगण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर सध्याची सुमारे १५५० किलोमीटरची पदयात्रा हा त्यांच्या धार्मिक आणि सामाजिक प्रवासातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. गायत्री नगर, जालना येथून १५ ऑगस्ट रोजी सुरू झालेल्या या पदयात्रेने महाराष्ट्रातील विविध टप्पे पार करत गुजरातमध्ये प्रवेश केला. त्यानंतर राजस्थानातील धार्मिक स्थळांकडे वाटचाल करत बाबा रामदेवरा, सालासर बालाजी आणि खाटूश्यामजी अशी प्रमुख धार्मिक स्थळे त्यांनी पायी गाठली. प्रदीर्घ अंतरामुळे हा प्रवास शारीरिकदृष्ट्या आव्हानात्मक होता. मात्र सातत्यपूर्ण चाल, श्रद्धा आणि मनातील संकल्पाच्या जोरावर त्यांनी अखेर खाटूश्यामजी गाठले. ''सभी का कल्याण, समृद्धि और एकतायही मेरा संकल्प'' आणि ''मेरा कदम भारत के उज्ज्वल कल के लिए'' हा संदेश घेऊन सोनू जोशी यांनी ही पदयात्रा पूर्ण केली आहे. जालन्यातील गायत्री नगरातून हातात धर्मध्वज घेऊन निघालेला हा प्रवास आता खाटूश्यामजीच्या चरणी पोहोचला आहे. जवळपास १५५० किलोमीटरचा पायी प्रवास पूर्ण करत त्यांनी आपल्या संकल्पाची पूर्तता केली असून, आता त्याच श्रद्धेने आणि निर्धाराने जालन्याकडे परतीच्या प्रवासाला सुरुवात होणार आहे. खाटूश्यामजीचे दर्शन घेतल्यानंतर सुरू होणारा हा परतीचा प्रवासही तितकाच महत्त्वाचा ठरणार आहे. जालन्यातून सुरू झालेला संकल्प राजस्थानातील तीर्थक्षेत्रांपर्यंत पोहोचवून पूर्ण केल्यानंतर आता ''जालना ते राजस्थान आणि पुन्हा राजस्थान ते जालना'' असा हा प्रदीर्घ प्रवास पूर्णत्वाकडे वाटचाल करणार आहे.

### मोटारसायकल...

दोघांना ताब्यात घेतले. पोलिसांनी दोघांची चौकशी केली असता, त्यांनी आणखी एका साथीदाराच्या मदतीने विविध ठिकाणांहून मोटारसायकली चोरी केल्याची माहिती दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

चौकशीत जालना शहरातील उढाण कॉम्प्लेक्स, लक्कडकोट तसेच परभणी आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील विविध ठिकाणांहून मोटारसायकली चोरी केल्याची माहिती समोर आली आहे.

पोलिसांनी आरोपींकडून युनिकॉर्न, शाईन, स्प्लेंडर, सुपर स्प्लेंडर, सी.डी. डॉन आदी विविध कंपन्यांच्या मोटारसायकली जप्त केल्या आहेत. जप्त केलेल्या १० दुचाकींची एकूण किंमत सुमारे ४ लाख ३० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

जप्त केलेल्या मोटारसायकलींच्या अनुषंगाने जालना जिल्ह्यातील तालुका जालना, सदर बाजार आणि कदीम जालना पोलीस ठाण्यांमध्ये, तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जिन्सी आणि एमआयडीसी सिडको पोलीस ठाण्यांमध्ये आणि परभणी जिल्ह्यातील मानवत पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा संबंध समोर आला आहे.

या कारवाईत आतापर्यंत एकूण आठ गुन्हे उघडकीस आणण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. जप्त केलेल्या मोटारसायकलींच्या मूळ मालकांचा शोध घेऊन त्या त्यांना परत करण्याची प्रक्रिया तपासानंतर केली जाणार आहे.

या प्रकरणात आणखी एका साथीदाराचा सहभाग असल्याची माहिती चौकशीत समोर आल्याने पोलिसांकडून त्याचा शोध घेतला जात आहे. त्यामुळे मोटारसायकल चोरीच्या या प्रकरणात आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. आरोपींकडून चोरीच्या दुचाकी कुठे विकल्या जात होत्या, चोरीसाठी कोणत्या पद्धतीचा वापर केला जात होता आणि या टोळीशी आणखी कोणाचा संबंध आहे का, याचा तपास सुरू आहे. ताब्यात घेतलेल्या दोन्ही आरोपींना जप्त मोटारसायकलींसह तालुका जालना पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले असून, पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी पंकज जाधव, पोलीस निरीक्षक राजेंद्र वाघ, पोलीस उपनिरीक्षक स्थागुशा जालना, तसेच सफौ. रामप्रसाद पव्हरे, पोलीस अंमलदार रमेश राठोड, प्रभाकर वाघ, कैलास खार्डे, रुस्तुम जैवाळ, ईरशाद पटेल, बाबा गायकवाड, संदीप चिंचोले, धीरज भोसले, वसंत धस आणि चालक अशोक जाधवर यांच्या पथकाने ही कारवाई केली.

### गोवंशाच्या मांसाची...

कारवाई योग्य असल्याचे प्रतिपादन केले.

दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकून न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, ८० किलो गोमांस वाहनात आढळल्याने याचिकाकर्त्यानेच गोवंश हत्या केल्याचे कायदेशीर गृहीतक बनते. तसेच संशयित प्रवाशांना साक्षीदार म्हणून तपासण्याचे किंवा ते मांस त्यांचेच होते हे सिद्ध करण्याचे कोणतेही ठोस पुरावे मालकाने सादर केलेले नाहीत. त्यामुळे सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेला वाहन जप्तीचा निर्णय योग्य ठरवत न्यायालयाने याचिका फेटाळून लावली.

या कायदेशीर घडामोडीवर मत व्यक्त करताना ॲड. महेश धन्नावत म्हणाले, ''अलाहाबाद उच्च न्यायालयाचा हा निकाल गोवंश प्रतिबंधक कायद्याच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने अत्यंत पथदर्शी आहे. कायद्यातील कलम ५-ए अंतर्गत वाहन चालक आणि मालकावर अत्यंत कठोर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. जर मालक स्वतः घटनास्थळी वाहनात उपस्थित असेल, तर केवळ हे साहित्य प्रवाशांचे होते असा वरवरचा बचाव करून सुटका होणार नाही. कायद्यातील गृहीतक उलटवण्याचा भार ( ) संपूर्णपणे मालकावरच असतो, हे या निकालाने पुन्हा एकदा ठळकपणे अधोरेखित केले आहे.''

### पोषण व...

विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजहितासाठी करावा, असे सांगितले. संस्थेचे संचालक प्रा. डॉ. एस. टी. म्हस्के यांनी विद्यार्थ्यांच्या सहभागाचे कौतुक करत अशा उपक्रमांमधून शैक्षणिक ज्ञानासोबत सामाजिक बांधिलकीची जाणीव विकसित होत असल्याचे नमूद केले. प्रा. डॉ. एस. टी. म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली आणि डॉ. रमेश चव्हाण, डॉ. संध्या शेवाळे यांच्या समन्वयाने आयोजित या उपक्रमात पोषणशास्त्र, अन्नतंत्रज्ञान, अन्न अभियांत्रिकी आणि आरोग्याशी संबंधित विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. संतुलित आहार, पोषक घटक, अन्नसुरक्षा, अन्नप्रक्रिया, पोषणमूल्य, शाश्वत पोषण आणि जबाबदार अन्नव्यवस्था या विषयांवर विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांच्या माध्यमातून जनजागृती केली. पथनाट्य, पोस्टर सादरीकरण, ग्राफिकल ॲब्स्ट्रॅक्ट, प्रश्नमंजुषा तसेच विविध शैक्षणिक आणि सर्जनशील स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. पोषण हा केवळ आहाराचा विषय नसून तो आरोग्य, अन्नसुरक्षा, पर्यावरण आणि शाश्वत विकासाशी निगडित असल्याचा व्यापक दृष्टिकोन या उपक्रमातून विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आला. वैज्ञानिक माहिती सर्जनशील पद्धतीने समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांतून केला. 'योग्य पोषण हे निरोगी जीवनाचा आधारस्तंभ' हा संदेश घेऊन सुरू झालेल्या न्यूट्रीफिएस्टामुळे विद्यार्थ्यांना पोषणविषयक ज्ञान, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक जबाबदारी यांची सांगड घालण्याची संधी मिळत आहे. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. रमेश चव्हाण, डॉ. संध्या शेवाळे, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी समन्वयक आणि सहभागी विद्यार्थी विशेष परिश्रम घेत आहेत.

### घोषणांचा पाऊस...

गंगाधर जाधव यांच्या गट क्रमांक २५५ मधील ७ एकर क्षेत्रातील नुकसानग्रस्त सोयाबीन पिकाची त्यांनी थेट बांधावर जाऊन पाहणी केली आणि हताश झालेल्या शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांना धीर दिला.

''मी राजकारण करायला नाही, कुटुंबप्रमुख म्हणून आलोय'' पाहणी दौऱ्यादरम्यान शेतकऱ्यांशी संवाद साधताना आदित्य ठाकरे म्हणाले, ''मी येथे कोणतेही राजकारण करण्यासाठी आलेलो नाही. पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या स्पष्ट सूचनेनुसार जिथे जिथे शेतकरी संकटात सापडला आहे, तिथे शिवसेना एक कुटुंबप्रमुख म्हणून त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहणार आहे. शेतकरी कोणत्याही पक्षाचा असो अथवा जाती-धर्माचा, संकटाच्या या काळात त्याला विनाअट आणि थेट मदत मिळवून देणे हेच आमचे प्रथम कर्तव्य आहे. शेतकऱ्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्यासाठी पक्षाच्या वतीने ठिकठिकाणी तातडीने मदत केंद्रे सुरू केली जात असून, जाहीर झालेली मदत प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या पदरात पडेपर्यंत शिवसैनिक शासनदरबारी पाठपुरावा करतील.'बँकेच्या जप्ती नोटिसा तात्काळ थांबवा; प्रमुख मागण्या

यावेळी दुष्काळग्रस्त परिस्थितीवर बोट ठेवत ठाकरे यांनी शासनापुढे थेट मागण्या मांडल्या यामध्ये जप्ती व वसुली नोटिसांना स्थगिती - दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकऱ्यांना बँकांकडून दिल्या जाणाऱ्या जप्ती व कर्जवसुलीच्या नोटिसा तातडीने बंद करण्यात याव्यात. कर्जमाफी व पीकविमा वितरण - संपूर्ण कर्जमाफीची त्वरित अंमलबजावणी करावी, ज्या शेतकऱ्यांची नावे यादीत आली आहेत त्यांना तात्काळ लाभ द्यावा आणि पीकविम्याची थकीत रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावी. हिशोब जाहीर करा - जलयुक्त शिवारच्या १२ हजार कोटींचा आणि अतिवृष्टीच्या ३२ हजार कोटींच्या पॅकेजचा नेमका काय उपयोग झाला, याचा जाब सरकारने जनतेला द्यावा. विद्यार्थ्यांचे संपूर्ण शैक्षणिक शुल्क माफ करा - दुष्काळ आणि नापिकीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी, शेतमजूर आणि चारा छावण्यांच्या आधारावर जगणाऱ्या कुटुंबांतील मुला-मुलींचे संपूर्ण वर्षाचे परीक्षा व शैक्षणिक शुल्क शासनाने १०० टक्के माफ करावे.

''शिक्षण कसं करायचं?'' विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर ठाकरे संतप्त

पाहणीदरम्यान परिसरातील विद्यार्थ्यांनी आदित्य ठाकरे यांची भेट घेऊन आपले गाऱ्हाणे मांडले. ''शेतातले पीक पूर्णपणे वाया गेले असून हातात एक रुपयाही उत्पन्न उरलेले नाही, अशा बिकट परिस्थितीत आम्ही पुढे शिक्षण कसे घ्यायचे? फी कुठून भरायची?'' असा सवाल विद्यार्थ्यांनी उपस्थित केला. विद्यार्थ्यांची व्यथा ऐकून आदित्य ठाकरे यांनी तीव्र संताप व्यक्त करत सरकारच्या बेफिकीर धोरणावर ताशेरे ओढले. शेतकऱ्यांनी पिकांसाठी केलेला खर्च, नापिकी आणि डोक्यावर कर्जाचा डोंगर यामुळे प्रपंच कसा चालवायचा, या विवंचनेत बळीराजा अडकल्याचे त्यांनी नमूद केले. 'शेतकऱ्यांनो, धीर सोडू नका; आत्महत्या करू नका!'' बळीराजाला अत्यंत भावनिक साद घालत आदित्य ठाकरे म्हणाले, ''संकटे कितीही मोठी असली तरी माझ्या शेतकरी बांधवांनी धीर सोडू नये. कोणत्याही परिस्थितीत आत्महत्येसारखे टोकाचे आणि घातक पाऊल उचलू नका. उद्धव ठाकरे आणि संपूर्ण शिवसेना तुमच्या पाठीशी आहे. कोणतीही अडचण किंवा संकट असल्यास निःसंकोचपणे आम्हाला सांगा; तुमच्या न्याय्य हक्कासाठी शिवसेना रस्त्यावर उतरून शेवटच्या क्षणापर्यंत लढा देईल.''

या पाहणी दौऱ्यावेळी आदित्य ठाकरे यांच्यासमवेत विधानपरिषदेचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार राहुल पाटील, आ. कैलास पाटील, उपनेते डॉ. विवेक नावंदर, संपर्क प्रमुख प्रदिपकुमार खोपडे, परभणी चे महापौर इकबाल भाई, शिवसेना नेत्या आयोध्या पौळ, शिवसेना जालना जिल्हाप्रमुख महेश नळगे, नगरपालिका गटनेते गणेश नळगे, ज्येष्ठ नेते माधवराव कदम, मंठा तालुकाप्रमुख भारत पंडीत, संजय खंदारे, गणेश दराडे, अशोकराव आढाव, आबा कदम, दत्ता पाटील सुरुंग, राहुल कदम, माऊली सरकटे, विठ्ठल वटाने, विष्णुपंत जगताप, दिपक काळे, संदिप पाचारे यांच्यासह महिला शेतकरी, स्थानिक पदाधिकारी, शिवसैनिक, विविध क्षेत्रांतील कार्यकर्ते आणि परतूर मंठा तालुका व वरफळ परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### फॉल्टी मीटर...

इच्छा नसल्याने तक्रारदाराने २७ सप्टेंबर २०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे लेखी तक्रार नोंदवली.

सापळा रचून केली कारवाई

तक्रार प्राप्त झाल्यानंतर एसीबीच्या पथकाने २७ सप्टेंबर रोजी पडताळणी केली. या दरम्यान तडजोडीअंती १३ हजार रुपयांची लाच स्वीकारण्याचे अरुण गिते यांनी मान्य केले. त्यानंतर दुपारी १:१० वाजता जिरगे नगर येथील डीपीजवळ सापळा रचून तक्रारदाराकडून १३ हजार रुपयांची लाच घेताना गिते यांना रंगेहाथ ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यांनी केली कारवाई

ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगरच्या पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे आणि अपर पोलीस अधीक्षक श्री शंतनू शिंगारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक श्री. बी. एस. जाधवर, पोलीस अंमलदार गजानन घायवट, मनोहर भुतेकर, गजानन कांबळे, शिवलिंग खुळे, गणेश चेके आणि चालक नायब कापसे यांच्या पथकाने केली.

### गणेशोत्सवात सलग....

चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष पन्नालाल बगडिया, माजी प्रांतपाल डॉ. सुरेश साबू, डॉ. राजेश सेठिया, संतोष तिवारी, रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्या अध्यक्षा मधुलाता भक्कड, सचिव डॉ. अतुल जिंतूरकर, कोषाध्यक्ष केतन शहा, जयेश पहाडे, डॉ. नितीन खंडेलवाल, संदीप राठी, गौरव करवा, विवेक मणियार, कल्पेश भक्कड, महेश माळी, पंकज लड्डा आदींची उपस्थिती होती. यावेळी डॉ. सेठिया म्हणाले की, वेळीच निदान झाल्यास मधुमेह नियंत्रित ठेवता येतो. प्री-डायबेटिक असणाऱ्यांचे मधुमेह रुग्ण म्हणून रूपांतर होते. वेळीच निदान आणि उपचारानंतर त्याला मधुमेह रुग्ण होण्यापासून वाचविता येऊ शकते. ही बाब विचारात घेता, प्रत्येकाने मधुमेह निदान करून घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. रोटरी रेनबो क्लबच्या अध्यक्षा मधुलता भक्कड यांनी या शिबिराचा उद्देश विशद केला आणि यापुढेही आवश्यक तेथे निदान शिबिरे घेतली जातील, असे स्पष्ट केले.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी रोटरी रेनबो क्लब आणि रुबी हॉस्पिटलचा स्टाफ डॉ. लीना पवार, डॉ. मिथुन चालोदे, शर्मिला सिन्हा, संगीता लांडगे, मीना घुमरे, छाया खंदारे, बाबुल अल्हाट, अजीम मणियार, संजय जोगदंड, सतीश वरखडे, संदीप राऊत आदींनी विशेष परिश्रम घेतले.

**समाजोपयोगी उपक्रमांसाठी ट्रस्टचे सदैव सहकार्य-पन्नालाल बगडिया**

आरोग्य, शिक्षण आणि समाजसेवा या क्षेत्रांना प्राधान्य देऊन समाजोपयोगी उपक्रमांना हातभार लावणे, हा सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. त्या अंतर्गत डॉ. राजेश सेठिया यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या एक लाख मोफत मधुमेह निदान चाचण्या, मोफत थायरॉईड निदान चाचण्या तसेच फुप्फुस तपासणीसारख्या आरोग्यविषयक उपक्रमांना ट्रस्टने सक्रिय सहकार्य केले आहे. गरजू घटकांना आरोग्यसुविधा सहज उपलब्ध करून देतानाच आरोग्यविषयक जनजागृती आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेला चालना देणे, हे ट्रस्टचे प्रमुख उद्दिष्ट आहे. भविष्यातही आरोग्य, शिक्षण आणि समाजहिताशी संबंधित विविध उपक्रमांना ट्रस्टच्या माध्यमातून सातत्याने सहकार्य केले जाईल, असे सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष पन्नालाल बगडिया यांनी सांगितले.

# प्रशासनाला अधिक पारदर्शी करणारा माहितीचा अधिकार अधिनियम २००५

२८ सप्टेंबर हा दिवस जगभरात ‘माहितीचा सार्वत्रिक प्रवेश दिन’ म्हणून पाळला जातो. माहिती मिळणे हा केवळ प्रशासकीय सोयीचा विषय नसून लोकशाहीतील नागरिकांच्या सहभागाचा, शासनाच्या उत्तरदायित्वाचा आणि पारदर्शकतेचा महत्त्वपूर्ण आधार आहे. याच जाणिवेचा विस्तार भारतात ‘माहितीचा अधिकार अधिनियम, २००५’च्या माध्यमातून झाला. आता हा कायदा आपल्या २१व्या वर्षात पदार्पण करत आहे. प्रशासनात पारदर्शकता ठेवणे व अभिलेखे उत्तम प्रकारे जतन करणे याची शिस्त या कायद्याने लावली आहे. सोबतच या देशाच्या सामान्य नागरिकांना आम्ही जबाबदार आहोत, याची जाणीव प्रशासनाच्या प्रत्येक स्तराला करून देण्यात या कायद्याला यश आले आहे.

२८ सप्टेंबरचे कायद्यामध्ये महत्त्व

माहितीच्या सार्वत्रिक प्रवेशाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी युनेस्कोच्या सर्वसाधारण परिषदेने २०१५ मध्ये २८ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन ( ) म्हणून घोषित केला. त्यानंतर ऑक्टोबर २०१९ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या ७४व्या महासभेनेही या दिवसाला आंतरराष्ट्रीय मान्यता दिली. माहितीपर्यंत समान आणि सार्वत्रिक प्रवेश हा सुजाण निर्णयप्रक्रिया, लोकशाही, समावेशकता आणि उत्तरदायी संस्था यांच्यासाठी आवश्यक असल्याचे युनेस्को नमूद करते.

माहितीच्या अधिकाराची जागतिक वाटचाल*

माहितीच्या अधिकाराची संकल्पना आधुनिक काळात सर्वप्रथम कायद्याच्या स्वरूपात स्वीडनमध्ये २ डिसेंबर १७६६ रोजी अस्तित्वात आली. स्वीडिश फ्रीडम ऑफ द प्रेस ऑर्डिनन्स ( ) हा सार्वजनिक माहितीपर्यंत प्रवेशाची हमी देणारा जगातील पहिला कायदा मानला जातो. भारतामध्ये मात्र या अधिकारामागची वाटचाल सामाजिक चळवळी, लोकशाही मूल्ये आणि प्रशासनातील पारदर्शकतेच्या मागणीशी जोडलेली आहे.

**‘हमारा पैसा, हमारा हिसाब’ ते माहितीचा अधिकार**

राजस्थानातील मजदूर किसान शक्ती संघटनेच्या आंदोलनाने भारतातील माहिती अधिकार चळवळीला व्यापक लोकाधार मिळवून दिला. अरुणा रॉय, निखिल डे आणि शंकर सिंह यांच्यासह कार्यकर्त्यांनी गावकऱ्यांच्या विकासकामांवरील खर्चाची नोंद, मजुरीची माहिती आणि सरकारी अभिलेख लोकांसमोर आणण्याची मागणी केली. ‘आमचा पैसा, आमचा हिशेब’ ही भूमिका या चळवळीच्या केंद्रस्थानी होती. सरकारी कामात आपले श्रम आणि पैसा वापरला जात असेल तर त्या कामाचा हिशेब जाणून घेण्याचा नागरिकांना अधिकार असावा, या साध्या प्रश्नातून ही चळवळ उभी राहिली.

या चळवळीच्या अनुभवातून राष्ट्रीय पातळीवर नॅशनल कॅम्पेन फॉर पीपल्स राईट टू इन्फॉर्मेशन ( ’ ()) ची स्थापना १९९६ मध्ये झाली. अरुणा रॉय आणि निखिल डे यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते, कायदेतज्ज्ञ, पत्रकार आणि नागरी समाजातील व्यक्तींनी माहितीच्या अधिकारासाठी राष्ट्रीय पातळीवर सातत्याने पाठपुरावा केला.




महाराष्ट्रातही माहितीच्या अधिकाराच्या मागणीला सामाजिक चळवळींचा आधार मिळाला. अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात पारदर्शक प्रशासनासाठी झालेल्या आंदोलनांनी माहितीच्या अधिकाराच्या मागणीला जनमानसात स्थान मिळवून दिले. महाराष्ट्राने २००२ मध्ये स्वतंत्र माहिती अधिकार कायद्याच्या माध्यमातून एक महत्त्वाचे पाऊल उचलले. १० ऑगस्ट २००२ रोजी त्याला राष्ट्रपतींची मंजुरी मिळाली होती.

**२००५ : देशव्यापी कायद्याचा निर्णायक टप्पा**

केंद्र सरकारने यापूर्वी फ्रीडम ऑफ इन्फॉर्मेशन ॲक्ट ( , २००२) केला होता. मात्र अधिक प्रभावी, सहभागी आणि अर्थपूर्ण माहिती अधिकाराची गरज लक्षात घेऊन तो कायदा बाजूला ठेवून नवा कायदा करण्याची प्रक्रिया सुरू झाली. माहितीचा अधिकार विधेयक २३ डिसेंबर २००४ रोजी लोकसभेत मांडण्यात आले. दोन्ही सभागृहांनी मे २००५ मध्ये ते मंजूर केले. राष्ट्रपतींची संमती १५ जून २००५ रोजी मिळाली, अधिनियमाचे राजपत्रात प्रकाशन २१ जून २००५ रोजी झाले आणि १२ ऑक्टोबर २००५ रोजी हा कायदा पूर्णपणे लागू झाला.

त्यामुळे सप्टेंबर २०२६ मध्ये देशव्यापी माहिती अधिकार कायद्याला २० वर्षे पूर्ण होऊन २१व्या वर्षात प्रवेश झाला आहे. महाराष्ट्रात केंद्रीय अधिनियमाची अंमलबजावणीही १२ ऑक्टोबर २००५ पासूनच झाली. त्याआधी राज्याचा स्वतंत्र २००२ चा कायदा अस्तित्वात होता.

**नागरिकांच्या हातातील प्रभावी साधन**

माहितीचा अधिकार अधिनियमामुळे नागरिकांना सार्वजनिक प्राधिकरणांकडील अभिलेख, दस्तऐवज, आदेश, अहवाल, करार, नोंदी आदींबाबत माहिती मागण्याचा कायदेशीर अधिकार मिळाला. अर्जदाराला माहिती का हवी आहे, याचे कारण देणे कायद्याने आवश्यक नाही. साधारणपणे माहिती देण्यासाठी ३० दिवसांची मुदत आहे; जीवन किंवा स्वातंत्र्याशी संबंधित माहिती ४८ तासांत देण्याची तरतूद आहे. माहिती न मिळाल्यास प्रथम अपील आणि त्यानंतर द्वितीय अपील किंवा तक्रारीची व्यवस्था आहे. माहिती देण्यात कायद्यातील अटींचे उल्लंघन झाल्यास संबंधित जन माहिती अधिकाऱ्यावर दररोज २५० रुपये, कमाल २५ हजार रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे. यामुळे नागरिकाला ‘शासन काय करते?’ हा प्रश्न विचारण्याबरोबरच ‘शासनाने कोणत्या नोंदीच्या आधारे निर्णय घेतला?’ हे जाणून घेण्याची कायदेशीर संधी मिळाली.

**प्रशासनात झालेला बदल**

माहिती अधिकारामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर दोन प्रकारे परिणाम झाला. पहिला म्हणजे उत्तरदायित्वनिर्णय, आदेश आणि अभिलेख व्यवस्थित ठेवण्याची गरज वाढली. दुसरा म्हणजे स्वयंप्रेरित माहिती प्रकटीकरण. कायद्याच्या कलम ४ अंतर्गत सार्वजनिक प्राधिकरणांनी अनेक बाबी स्वतःहून प्रसिद्ध करणे अपेक्षित आहे. महाराष्ट्र राज्य माहिती आयोगानेही कलम ४ ची प्रभावी अंमलबजावणी, संकेतस्थळांवर माहिती अद्ययावत ठेवणे आणि अभिलेखांचे संगणकीकरण यावर सातत्याने भर दिला आहे.

आज ई-गव्हर्नन्स, ऑनलाइन अर्ज, डिजिटल अभिलेख, संकेतस्थळांवरील १७ बाबींचे प्रकटीकरण आणि ऑनलाइन अपील यामुळे माहिती मिळविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ झाली आहे. महाराष्ट्र शासनाचे ऑनलाइन पोर्टल नागरिकांना अर्ज व प्रथम अपील ऑनलाइन दाखल करण्याची सुविधा देते.

**कायद्यातील काही महत्वाचे बदल**

केंद्रीय पातळीवर , २०१२ लागू झाले. त्यानंतर २०१९ मध्ये अधिनियमात महत्त्वाची सुधारणा करून केंद्रीय व राज्य माहिती आयुक्तांच्या पदावरील कार्यकाळ, वेतन, भत्ते आणि सेवा अटी केंद्र शासनाने नियमांद्वारे निश्चित करण्याची तरतूद करण्यात आली.

महाराष्ट्राने आता आणखी एक अद्ययावत पाऊल टाकले असून ‘महाराष्ट्र माहिती अधिकार नियम, २०२६’ दिनांक ७ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध झाले आहेत. ऑनलाइन प्रणालीवर त्याची अधिकृत नोंद उपलब्ध आहे.

**महाराष्ट्रातील माहिती आयोगाची व्यवस्था**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाची स्थापना १२ ऑक्टोबर २००५ रोजी झाली. आयोगात मुख्य माहिती आयुक्त आणि राज्य माहिती आयुक्तांची व्यवस्था आहे. सध्या श्री. राहुल भालचंद्र पांडे हे मुख्य माहिती आयुक्त आहेत. विभागीय पातळीवर बृहन्मुंबई येथे डॉ. प्रदीप व्यास, पुणे व छत्रपती संभाजीनगर येथे श्री. मकरंद मधुसूदन रानडे, नाशिक व कोकण येथे श्री. प्रकाश शामराव इंदलकर यांच्याकडे आहे. अमरावती येथे श्री. रविंद्र हनुमंतराव ठाकरे आणि नागपूर येथे श्री. गजानन श्रीधर निमदेव कार्यरत आहेत. राज्य शासनाने अनुभवी आणि कर्तव्यदक्ष व्यक्तींची या पदावर नेमणूक केल्यामुळे आयोगाची प्रलंबितता मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे.

अशा प्रकारे मुंबई मुख्यालयासह सात विभागीय कार्यक्षेत्रांत आयोगाची सुनावणी व्यवस्था उपलब्ध आहे. आयोगाच्या संकेतस्थळावर मासिक निकाली प्रकरणांचे अहवाल, निर्णय आणि सुनावणी तक्तेही प्रसिद्ध केले जातात.

**वापर आणि गैरवापराची चर्चा**

घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी घटना समिती समोर भाषण करताना एक बाब अधोरेखित केली होती. ते म्हणाले होते, ‘‘ही घटना भारतीय लोकशाहीसाठी अत्यंत उपयुक्त करू शकते मात्र,याचा वापर कोण करते आणि देशहितासाठी किती आपुलकीने करते यावर आपल्या देशाचे भविष्य राहील ‘‘ हा कायदा ही अशाच प्रकारे पारदर्शी लोकप्रशासनासाठी अधिक सक्रियतेने वापरणे गरजेचे आहे. माहितीचा अधिकार हा लोकशाहीतील प्रभावी नागरिक-साधन आहे; मात्र त्याचा वापर कायद्याच्या उद्देशाशी सुसंगत असणेही तितकेच आवश्यक आहे. वैयक्तिक स्वरूपाची, व्यापक जनहिताशी संबंध नसलेली माहिती किंवा सार्वजनिक प्राधिकरणाकडे अस्तित्वात नसलेली नवी माहिती निर्माण करून देण्याची अपेक्षा कायद्याच्या चौकटीत येत नाही. त्यामुळे अधिकाराचा वापर करताना तथ्याधारित, नेमकी आणि सार्वजनिक कामकाजाशी संबंधित माहिती मागणे ही नागरिकांचीही जबाबदारी आहे. प्रशासनानेही कायद्यातील अपवादांचा अवाजवी विस्तार न करता पात्र माहिती वेळेत उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे.

**यंदाचा विशेष उपक्रम**

२०२६ मध्ये महाराष्ट्रात माहिती अधिकार दिन अधिक व्यापक जनजागृतीच्या माध्यमातून साजरा करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे आणि इतर शैक्षणिक संस्थांमध्ये माहितीच्या अधिकारावर आधारित प्रश्नमंजुषा, चित्रकला, निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा, तसेच चर्चासत्रे आणि व्याख्यानमाला आयोजित करण्याचा उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमातून माहितीचा अधिकार हा केवळ अर्ज करण्यापुरता कायदा नसून लोकशाही मूल्यांची जाणीव करून देणारे नागरिक शिक्षण आहे, हा संदेश तरुण पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न आहे.

**पारदर्शक प्रशासनाकडे वाटचाल**

माहितीचा अधिकार म्हणजे शासन आणि नागरिक यांच्यातील अविश्वासाची भिंत उभी करणे नव्हे; उलट विश्वासाचा पाया अधिक भक्कम करणे होय. माहिती उपलब्ध असेल तर प्रश्न अधिक नेमके होतात, प्रशासनाला आपल्या निर्णयांचे कारण स्पष्ट ठेवावे लागते आणि नागरिकांचा शासनप्रक्रियेतील सहभाग वाढतो.

गेल्या दोन दशकांत माहितीच्या अधिकाराने सामान्य नागरिकाच्या हातात प्रशासनाच्या दाराची किल्ली दिली आहे. ही किल्ली जबाबदारीने वापरली तर ती केवळ एखाद्या फाईलचा दरवाजा उघडत नाही; ती प्रशासनातील पारदर्शकतेची खिडकी उघडते.

या कायद्याचा वापर लोकशाहीत सत्ता जनतेकडून येते आणि प्रशासन जनतेसाठी काम करते. त्यामुळे शासनाच्या कामकाजाची माहिती जनतेला उपलब्ध असणे ही लोकशाहीची नैसर्गिक गरज आहे. माहितीचा अधिकार अधिनियमाने या गरजेला कायदेशीर बळ दिले आहे. पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि नागरिकांचा सहभाग या तीन आधारस्तंभांवर उभे राहणारे प्रशासन अधिक सक्षम, संवेदनशील आणि लोकाभिमुख होण्यासाठी माहितीचा अधिकार महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

म्हणूनच २८ सप्टेंबरचा माहिती अधिकार दिन हा केवळ एक दिवस साजरा करण्याचा प्रसंग नाही; तर ‘शासनाची माहिती जनतेपासून लपविण्याची नव्हे, ती कायद्याच्या चौकटीत जनतेपर्यंत पोहोचविण्याची’ लोकशाही बांधिलकी पुन्हा अधोरेखित करण्याचा दिवस आहे. पारदर्शक प्रशासन हीच सुशासनाची खरी ओळख आहे.

**प्रवीण टाके**
**उपसंचालक**
**विभागीय माहिती कार्यालय,**
**छत्रपती संभाजीनगर**
**९७०२८५८७७७**




महानगरपालिकेच्या वतीने गणरायाची मूर्ती दान करणाऱ्या भाविकाला एक जास्वंदाचे चे रोप देण्यात आले यावेळी उद्योजक राहुल अग्रवाल यांना जास्वंदाचे रोप देताना देताना आयुक्त सौ अंजली शर्मा उपायुक्त सौ नंदा गायकवाड उपायुक्त विजय फुलंब्रीकर विद्युत अभियंता सौ कोमल गावंडे सौ कांचन शेळके व इतर छायाचित्रात दिसत आहे छायाचित्र अनिल व्यवहारे



मुढेगावं ता.घनसावंगी येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये ६ वी वर्गा ची नुकतीच वाढ झाली.उर्दू शाळेचे शिक्षक इम्रान सर व उर्दू शाळेचे व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष समरीन मुजम्मील पटेल व उपाध्यक्ष हकीम पठाण यांच्या विशेष प्रयत्नातून मुढेगावं येथील विद्यार्थ्यांना ६ वी चा वर्ग मिळाला. त्याबद्दल नुकतेच स्थानिक गावकऱ्यांच्या वतीने इम्रान सर व समितीचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे कौतुक करून त्याचा सत्कार करण्यात आला.

# दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या लतादीदी

आपल्या मंजुळ आवाजाने संपूर्ण जगाला मोहिनी घालणारी भारताची गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांची आज जयंती. लता मंगेशकर यांचा आवाज म्हणजे जगातील आठवे आश्चर्य होते. त्यांचा आवाज म्हणजे रसिकांसाठी मोठी पर्वणीच होती. लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदूर येथे एका गोमंतकीय कुटुंबात झाला. लता दिदींना गायनाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून मिळाला. त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक आणि नाट्य अभिनेते होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी गायनाचे धडे गिरवले. तेच त्यांचे गायनातील पहिले गुरू होते. लता दिदींना लहानपणी हेमा नावाने हाक मारली जायची पण मास्टर दीनानाथ यांच्या एका नाटकातील नाव लतिका असे होते या नावावरूनच त्यांनी त्यांचे नाव लता असे ठेवले. हेच नाव आज जगातील आठवे आश्चर्य ठरले. आपल्या वडिलांच्या संगीत नाट्यात त्यांनी वयाच्या पाचव्या वर्षी काम केले. वयाच्या तेराव्या वर्षी लता दीदींनी गायन क्षेत्रात पाऊल ठेवले आणि १९४२ साली त्यांनी आपले पहिले गाणे रेकॉर्ड केले. किती हसाल ? या चित्रपटातील नाचू या गडे खेळू सारे..... हे गाणे त्यांनी गायले मात्र या गाण्याचा चित्रपटात समावेश झाला नाही. त्याचवर्षी मंगळागौर या चित्रपटात नटली चैत्राची नवलाई.... हे गाणे गायले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी काही मराठी चित्रपटात गाणी गायली. लता दिदींचे खूप गाजलेले पहिले गाणे म्हणजे १९४९ सालच्या महल चित्रपटातील खेमचंद प्रकाश या संगीतकाराने स्वरबद्ध केलेले आयेगा आनेवाला.... हे गाणे इतके लोकप्रिय झाले की त्यांच्याकडे संगीतकारांची रांग लागली. त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ लागली. १९५० नंतर दिदींचा उत्कर्षाचा काळ सुरू झाला. त्या काळातील नौशाद, सज्जाद, वसंत देसाई, दत्ता डावजेकर यासारखे जुने आणि त्या काळात उदयाला येणारे एस डी बर्मन, सी रामचंद्र, शंकर - जयकिशन, मदन - मोहन, उषा खन्ना, कल्याणजी - आनंदजी, रवी, लक्ष्मीकांत - प्यारेलाल, आर डी बर्मन अशा सर्वच संगीतकारांकडे दीदी गाऊ लागल्या. या सगळ्यांकडे गायलेल्या दिदींच्या गाण्याला अमाप लोकप्रियता मिळत गेली. त्यांच्या आवाजाने रसिक तृप्त होत गेले. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. त्या युद्धात भारताचे शेकडो जवान धारातीर्थी पडले. या शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २७ जून १९६३ रोजी दिल्लीत एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी एक खास गीत कवी प्रदीप यांनी लिहिले आणि सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केले होते. ते गीत लता दीदींनी गायले. ते गीत आजही लोकप्रिय असलेले ये मेरे वतन के लोगो....... हे गीत ऐकून तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना आपले आश्रू आवरता आले नाही. मराठीतही दीदींनी असंख्य गाणी गायली. आनंदघन या नावाने दीदींनी काही चित्रपटांना संगीतही दिले. जवळपास सात दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या लता दीदींनी जवळपास एक हजार चित्रपटातून ३० हजारांहून अधिक गाणी गायली. मराठी, हिंदीसह २० हुन अधिक प्रादेशिक भाषेत त्यांनी गाणी गायली. मधुबाला, नूतन, मीना कुमारी पासून श्रीदेवी, माधुरी, जुही ते काजोल, करिश्मा, करीना कपूरपर्यंत सर्व अभिनेत्रींना त्यांनी आवाज दिला. त्यांच्या गायन कलेची दखल घेऊन सरकारने त्यांना अनेक मानाचे पुरस्कार दिले. १९६९ साली भारत सरकारने त्यांना देशाचा सर्वोच्च तिसरा नागरी पुरस्कार पद्मभूषण देऊन गौरवले. १९९९ साली देशाचा सर्वोच्च दुसरा नागरी पुरस्कार पद्मविभूषणने गौरविण्यात आले. २००१ मध्ये त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरविण्यात आले. एम. एस. सुब्बालक्ष्मी नंतर या पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या त्या केवळ दुसऱ्या गायिका होत्या. त्यांना दादासाहेब फाळके हा चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार देखील मिळाला आहे. फ्रांस सरकारने ऑफिसर ऑफ लिजन ऑफ ऑनर या त्यांच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने त्यांना गौरविले आहे. लता दिदींना तीन वेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. फिल्मफेअर कडून त्यांचा दोनदा विशेष सन्मान करण्यात आला. कालांतराने त्यांनी नवीन गायकांना पुरस्कार मिळावा या हेतूने पुरस्कार स्वीकारणेच सोडून दिले. १९९२ साली महाराष्ट्र राज्य सरकारने लता मंगेशकर यांच्या नावाने पुरस्काराची सुरवात केली तर मध्यप्रदेश सरकारने १९८४ सालापासूनच लता मंगेशकर पुरस्कार देण्याची परंपरा सुरू केली. लता दिदींना अनेक विद्यापीठांनी मानाची डिलीट पदवी देऊन गौरविले. ६ फेब्रुवारी २०२२ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश स्तब्ध झाला. त्यांच्या निधनाने केवळ भारतातच नव्हे तर जगभर हळहळ व्यक्त केली गेली. त्यांच्या निधनाने एका दैवी युगाचा अंत झाला असे मानलं गेले. लता दिदींशीवाय भारतीय चित्रपट सृष्टीचा आणि संगीत कलेचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. आपल्या अलौकिक स्वरांनी चित्रपट सृष्टीवरच नव्हे तर संपूर्ण देशावर वेगळा ठसा उमटवणाऱ्या लता दिदींचे संगीत क्षेत्रातले योगदान पुढील १०० पिढ्यांना विसरता येणार नाही. जगभरातील कोट्यवधी संगीत प्रेमींच्या कानाला तृप्त करणारा दैवी स्वर आज हरपला असला तरी त्यांच्या आवाजाच्या परिसस्पर्शाने अजरामर झालेल्या गीतांच्या माध्यमातून हा स्वर अनंतकाळ आपल्या मनामध्ये गुंजन करत राहणार आहे. दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# गणेश विसर्जन मिरवणुकीतील डीजेचा थरकाप अन् चिमुरड्याचा मृत्यू

## सर्व सण-उत्सवांत आवाजावर मर्यादा हवी - ॲड. महेश धन्नावत

**जालना - प्रतिनिधी**

ध्वनिप्रदूषणाचा वाढता भस्मासुर आता निष्पाप जिवांवर बेतू लागला आहे. मध्य प्रदेशातील इंदूर येथे गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान डीजे सिस्टीमवर लावण्यात आलेल्या अत्यंत कर्णकर्कश आणि उच्च दाबाच्या आवाजामुळे शाळेत उपस्थित असलेल्या एका अवघ्या ७ वर्षांच्या निष्पाप बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या गंभीर घटनेची तीव्र दखल घेत मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने प्रशासनाला आणि पोलिसांना चांगलेच धारेवर धरले असून कडक कारवाईचे निर्देश दिले आहेत. दरम्यान, या घटनेवर जालना येथील ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. महेश धन्नावत यांनी तीव्र चिंता व्यक्त करत, ''ज्याप्रमाणे गणेश विसर्जन मिरवणुकांमध्ये डीजेमुक्तीचा आदर्श घालून देण्यात आला, तसाच नियम सर्व धर्म, सण-उत्सव आणि मंदिरे, मशिदी तसेच चर्च या सर्वच प्रार्थनास्थळांना समान रीतीने लागू झाला पाहिजे,'' अशी ठाम भूमिका मांडली आहे. गणेश विसर्जन मिरवणुकीतील घटनेचा हायकोर्टात दाखला; न्यायमूर्तींनी व्यक्त केला संताप

मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या इंदूर खंडपीठाचे न्यायमूर्ती सुबोध अभ्यंकर आणि न्यायमूर्ती जय कुमार पिल्लई यांच्या खंडपीठासमोर या संदर्भातील जनहित याचिकेवर सुनावणी पार पडली. कामकाजानंतर घरी परतताना खुद्द न्यायमूर्तींनी रस्त्यांवर विहित मर्यादेपेक्षा कितीतरी पट अधिक आवाजात लाऊडस्पीकर वाजत असल्याचे स्वतः अनुभवले होते. न्यायालयाने पीटीआयच्या त्या वृत्ताचा विशेष संदर्भ दिला, ज्यामध्ये एका शाळेसमोरून जात असलेल्या गणेश विसर्जन मिरवणुकीतील डीजेच्या महाप्रचंड आवाजामुळे शाळेत असलेल्या एका ७ वर्षांच्या निष्पाप बालकाचा मृत्यू झाला होता. यावर संताप व्यक्त करत खंडपीठाने ताशेरे ओढले की, ''प्रशासनाने कागदोपत्री उपाययोजनांची यादी सादर केली असली, तरी प्रत्यक्ष जमिनीवरील वास्तव अत्यंत चिंताजनक आहे.'' न्यायालयाने ध्वनिप्रदूषण नियम २००० आणि मध्य प्रदेश कोलाहल नियंत्रण अधिनियम १९८५ चे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाईचे आदेश दिले. तसेच सर्व सायलन्स झोनची यादी वृत्तपत्रांत प्रसिद्ध करून नागरिकांच्या तक्रारींसाठी तात्काळ हेल्पलाईन क्रमांक जाहीर करण्याचे निर्देश राज्य सरकार व पोलिसांना दिले आहेत. मंदिरे, मशिदी आणि चर्चसह सर्वांनीच नियमांचे पालन करावे: ॲड. महेश धन्नावत

मध्य प्रदेशातील या हृदयद्रावक घटनेवर प्रतिक्रिया देताना जालन्याचे प्रसिद्ध वकील ॲड. महेश धन्नावत म्हणाले: ''उत्सव आणि सण हे आनंद, भक्ती आणि सामाजिक ऐक्य वृद्धींगत करण्यासाठी असतात, कोणाचा जीव घेण्यासाठी नाहीत. गणेश विसर्जन मिरवणुकीतील डीजेच्या कानठळ्या बसवणाऱ्या आवाजाने एका ७ वर्षांच्या निष्पाप चिमुकल्याचा जीव जाणे ही अत्यंत क्लेशदायक आणि डोळे उघडवणारी घटना आहे. भारतीय संविधानाच्या कलम २१ अन्वये प्रत्येक नागरिकाला शांततापूर्ण आणि सुरक्षित जीवन जगण्याचा मूलभूत अधिकार आहे.

ज्याप्रमाणे गणेश विसर्जन मिरवणुकांमध्ये अनेक ठिकाणी स्वेच्छेने आणि प्रशासकीय नियमांमुळे डीजेमुक्त विसर्जन मोहीम राबवून पारंपारिक वाद्यांना प्राधान्य देण्यात आले, तीच शिस्त आणि नियमावली सर्व धर्म, सर्व जाती आणि सर्व सण-उत्सवांच्या मिरवणुकांमध्ये काटेकोरपणे लागू झाली पाहिजे. केवळ मिरवणुकाच नव्हे, तर मंदिरे, मशिदी आणि चर्च या सर्वच प्रार्थनास्थळांवरून होणाऱ्या लाऊडस्पीकरच्या वापरावरही ध्वनिमर्यादेचे नियम तितकेच कठोरपणे लागू झाले पाहिजेत. आवाजाची मर्यादा आणि शांततेचे नियम हे सर्वांसाठी समान असावेत; यात कोणताही दुजाभाव न ठेवता प्रशासनाने कठोर पावले उचलली पाहिजेत, तरच अशा निष्पाप बालकांचे बळी जाणे थांबेल.''नागरिकांनीही सण-उत्सवांचे पावित्र्य राखताना वृद्ध, आजारी व्यक्ती आणि लहान मुलांच्या आरोग्याचा विचार करून आवाजाच्या विहित मर्यादांचे पालन करावे, असे आवाहन आता सर्व स्तरातून व्यक्त होत आहे.

# नवकल्पना, उद्योगसंधी आणि युवा अभियंत्यांच्या भविष्यावर मंथन

## *रोटरी क्लब ऑफ जालना एलिटतर्फे अभियांत्रिकी दिन उत्साहात; अभियंता सदस्यांचा विशेष गौरव*

**जालना - प्रतिनिधी**




अभियांत्रिकी क्षेत्रातील नव्या संकल्पना, उद्योगक्षेत्रातील बदलत्या संधी आणि युवा अभियंत्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मार्गदर्शन करणारा विशेष कार्यक्रम रोटरी क्लब ऑफ जालना एलिटतर्फे आयसीटी अभियांत्रिकी महाविद्यालय, जालना येथे उत्साहात पार पडला. आजची नवकल्पना, उद्याचे उज्ज्वल भविष्य या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला अभियंते, विद्यार्थी, प्राध्यापक, उद्योग क्षेत्रातील मान्यवर आणि रोटरी सदस्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा यांना विशेष निमंत्रण देण्यात आले होते. अपरिहार्य कारणांमुळे त्या उपस्थित राहू शकल्या नाहीत. मात्र, त्यांनी कार्यक्रमाला शुभेच्छा देत उपक्रमाला पाठिंबा व्यक्त केला. कार्यक्रमास आयसीटीचे संचालक प्रा. डॉ. शशांक म्हास्के, सीएमआयएचे उपाध्यक्ष अभियंता मिहिर सौंदलगीकर तसेच उद्योग क्षेत्रातील मार्गदर्शक अभियंता सुनील रायथठ्ठा यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा. डॉ. शशांक म्हास्के यांनी अभियांत्रिकी शिक्षणातील बदल, तंत्रज्ञानातील नव्या दिशा आणि भविष्यातील संधी याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अभियंता मिहिर सौंदलगीकर यांनी उद्योगक्षेत्रातील बदलत्या संधी आणि अभियांत्रिकीच्या भविष्यातील भूमिकेवर विचार मांडले. अभियंता सुनील रायथठ्ठा यांनी विद्यार्थ्यांना नव्या कल्पनांना चालना देत भविष्यासाठी स्वतःला सक्षम करण्याचे आवाहन केले.

यावेळी आयसीटीचे माजी विद्यार्थी आशिष मंत्री यांनी उद्योग क्षेत्राशी विद्यार्थ्यांचा थेट संपर्क वाढविण्यासाठी प्रशिक्षणाच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्याची गरज व्यक्त केली. अशा संधींमुळे विद्यार्थ्यांना उद्योगविश्वाचा प्रत्यक्ष अनुभव मिळून व्यावसायिक क्षेत्रासाठी अधिक चांगली तयारी करता येईल, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात रोटरी क्लब ऑफ जालना एलिटमधील अभियंता सदस्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. व्यावसायिक क्षेत्रात योगदान देतानाच रोटरीच्या माध्यमातून समाजसेवा करणाऱ्या अभियंत्यांच्या कार्याचा गौरव यावेळी करण्यात आला. व्यावसायिक कौशल्यासोबत सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या सदस्यांचा सन्मान हा कार्यक्रमाचा विशेष आकर्षण ठरला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा अभियंता अनया अग्रवाल यांनी स्वागत व प्रास्ताविकातून कार्यक्रमामागील उद्देश स्पष्ट केला. अभियांत्रिकी हे केवळ व्यवसायाचे साधन नसून ज्ञान आणि नवकल्पनांच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडविण्याची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षणसंस्था, उद्योग आणि रोटरी यांच्यातील सहकार्य अधिक मजबूत करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष उद्योगानुभवाच्या संधी उपलब्ध करून देण्यावर यावेळी भर देण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रोटरी क्लब ऑफ जालना एलिटचे सचिव गणेश बाळे, सर्व रोटरी सदस्य तसेच आयसीटी महाविद्यालयाच्या व्यवस्थापन व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेला हा उपक्रम युवा अभियंत्यांना उद्योगविश्वाशी जोडणारा, नवकल्पनांना प्रोत्साहन देणारा आणि व्यावसायिक प्रगतीसोबत सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करणारा ठरला.

# अपघाताचा मुखवटा उतरला?

## शुभम वाघ मृत्यूला खुनाचे वळण;तिघांवर गुन्हा..

**भोकरदन - प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील वाकडी शिवारात २६ वर्षीय शुभम येडुबा वाघ यांच्या मृत्यूला अखेर खुनाचे वळण मिळाले आहे. सुरुवातीला रस्ते अपघात म्हणून समोर आलेल्या या घटनेत घातपाताचा संशय व्यक्त करत मृताच्या वडिलांनी पोलिसांकडे पाठपुरावा केला.त्यांच्या तक्रारीवरून भोकरदन पोलिसांनी तिघांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.येडुबा राजाराम वाघ (वय ५४) यांच्या तक्रारीवरून सोपान संजय जाधव, रवी महादू चिंचपुरे आणि पुनम उर्फ छकुली शुभम वाघ यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.शुभमचा विवाह नोव्हेंबर २०२४ मध्ये पुनम हिच्यासोबत झाला होता. त्यानंतर दोघांमध्ये कौटुंबिक वाद सुरू झाले. पुनम हिचे रवी चिंचपुरे याच्यासोबत कथित प्रेमसंबंध असल्याची माहिती शुभमच्या कुटुंबीयांना मिळाल्याचे तक्रारीत नमूद आहे. पत्नीला पुन्हा नांदवून घेण्यासाठी शुभमने कौटुंबिक न्यायालयात दावा दाखल केला होता.४ जुलै रोजी रवी चिंचपुरे याने शुभमला दावा मागे घेण्याची धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.त्यानंतर ७ जुलै २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७.५५ वाजता शुभम शेताकडे पायी जात असताना वाकडी-भोकरदन रस्त्यावर कैलास चिंचपुरे यांच्या शेताजवळ दुचाकीने त्याला धडक दिल्याचा आरोप आहे. या घटनेत शुभमचा मृत्यू झाला.मात्र, शुभमच्या वडिलांना हा मृत्यू अपघाती नसल्याचा संशय होता. त्यांनी पोलिसांकडे सातत्याने पाठपुरावा करत मुलाला दुचाकीची धडक देऊन ठार करण्यात आल्याचा आरोप केला.

# 'नशेला नकार, आरोग्याला स्वीकार'; युवक-युवतींच्या सहभागाने आरोग्य शिबिर संपन्न.

**जालना - प्रतिनिधी**



युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या अंतर्गत मेरा युवा भारत, जालना, युवा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व नर्सिंग महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत अभियान मेरा स्वस्थ, मेरा गर्व' अंतर्गत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. परिचर्या प्रशिक्षण केंद्र, शासकीय रुग्णालय, जालना येथे हे शिबिर उत्साहात पार पडले.

या कार्यक्रमाचे नियोजन मयुरकुमार गोरमे, जिल्हा युवा अधिकारी, माय भारत, जालना यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

कार्यक्रमास प्राचार्य पार्वती लोडते, जिल्हा युवा अधिकारी मयुरकुमार गोरमे, डॉ. रमेश काकड, वैद्यकीय अधिकारी, क्षयरोग विभाग, जालना तसेच बिस्मिल्ला सय्यद, नाशबंदी मंडळ जिल्हा संघटक यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाची प्रस्तावना मयुरकुमार गोरमे यांनी केली. यावेळी त्यांनी युवकांनी व्यसनमुक्त जीवनशैलीचा स्वीकार करून आरोग्यदायी आणि सक्षम समाजनिर्मितीत योगदान देण्याचे आवाहन केले.

बडॉ. रमेश काकड यांनी युवकांना व्यसनाधीनतेमुळे होणारे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दुष्परिणाम याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच संतुलित आहार, पोषण आणि निरोगी जीवनशैलीचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. युवकांनी व्यसनांपासून दूर राहून आपल्या आरोग्याची काळजी घेणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी बिस्मिल्ला सय्यद यांनीही युवकांना मार्गदर्शन करताना व्यसनमुक्त समाजनिर्मितीसाठी युवकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे नमूद केले. आरोग्य शिबिराच्या माध्यमातून युवक-युवतींमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. शिबिरात युवक व युवतींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी चंद्रकांत मुंढे, युवा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष जयपाल राठोड, गज्जेवार मॅडम तसेच कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचा समारोप प्राचार्य पार्वती लोडते यांच्या आभार प्रदर्शनाने झाला.

# डीजेमुक्त गणेशोत्सवाचा आनंद द्विगुणीत; आता आत्मपरीक्षणाची वेळ: मूर्तींच्या अवाजवी उंचीवर नियंत्रणासाठी दुर्गोत्सवापूर्वीच संयुक्त बैठकीची गरज!

**जालना - प्रतिनिधी**

यंदाचा गणेशोत्सव कानठळ्या बसवणाऱ्या डीजेच्या आवाजाशिवाय, पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि उत्साहात शांततेत पार पडला. सर्वसामान्य नागरिक, महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांनी या डीजेमुक्त वातावरणाचा मनापासून आनंद लुटला. हा विसर्जन सोहळा शांततेत, निर्विघ्न आणि सुरक्षितपणे पार पडावा यासाठी पोलीस विभाग, महानगरपालिका प्रशासन आणि वीज वितरण विभागाच्या (महावितरण) अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सलग ४८ तासांपेक्षा जास्त वेळ अहोरात्र खडा पहारा देत कौतुकास्पद कामगिरी बजावली. प्रशासनाचे हे अथक परिश्रम अत्यंत वाखाणण्याजोगे ठरले असले, तरी उत्सवाच्या अधिक सुरक्षित आणि सुनियोजित आयोजनासाठी आता सर्वांनीच गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

आगामी नवरात्रोत्सव व दुर्गोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने प्रशासनाने पुढच्या वर्षाची वाट न पाहता, आत्ताच तातडीने एकत्र येणे ही काळाची खरी गरज बनली आहे. विशेषतः इतर राज्यांप्रमाणे आपल्याकडेही मूर्तींच्या उंचीवर कायदेशीर मर्यादा आणणे अत्यंत गरजेचे असल्याचे वास्तव यंदा पुन्हा समोर आले आहे. विशालकाय मूर्तींच्या वाहतुकीमुळे शहरांमधील रस्ते आणि वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडल्याचे विदारक चित्र पाहायला मिळाले. रस्त्यांवरून अजस्र मूर्ती सुरक्षितपणे काढण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या अनेक हिरव्यागार वृक्षांच्या फांद्यांची अमानुष तोड करावी लागली. अतिउंच मूर्तींमुळे प्रमुख केबल्स, इंटरनेटच्या तारा आणि वीजवाहिन्यांचे प्रचंड नुकसान झाले; शिवाय अवजड वाहनांमुळे अनेक ठिकाणचे रस्तेही उखडले गेले. सर्वात गंभीर बाब म्हणजे, सुरक्षेचा उपाय म्हणून अनेक भागांत वीजपुरवठा खंडित करावा लागल्याने गणेश विसर्जन मिरवणुका चक्क अंधारात काढाव्या लागल्या. जर मूर्तींची उंची आटोक्यात असती, तर हा अंधार, नागरिकांची गैरसोय, प्रशासनावरील अतिरिक्त ताण आणि कोट्यवधी रुपयांचे सार्वजनिक नुकसान सहज टाळता आले असते. याच गणेशोत्सवादरम्यान मुंबईतील लालबाग, काळाचौकी येथील दत्ताराम लाड मार्गावरील महागणपती पंडालाजवळ विजेचा भीषण शॉक लागून दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर अनेक जण जखमी झाले. रविवार, २० सप्टेंबर २०२६ रोजी पहाटे २:२० ते ३:०० च्या सुमारास प्रचंड गर्दी असताना ही काळजाचा ठोका चुकवणारी दुर्घटना घडली. यामध्ये आठ वर्षांची चिमुरडी रागिणी घनश्याम यादव आणि एका महिलेचा मृत्यू झाला. जखमींपैकी चौघांसह तिघांची प्रकृती अद्याप अतिदक्षता विभागात () चिंताजनक आहे. ही हृदयद्रावक घटना केवळ गणेशोत्सवापुरती मर्यादित नसून, आगामी सर्वच सार्वजनिक उत्सवांसाठी डोळे उघडवणारी धोक्याची घंटा ठरली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर बोलताना ॲड. महेश धन्नावत यांनी मंडळांना कोणतीही तंबी किंवा इशारा न देता कळकळीची विनंती केली आहे. ते म्हणाले, ''श्रीगणेश हे संपूर्ण विश्वात विघ्नहर्ता म्हणून पूजले जातात; ते सर्वांचे विघ्न दूर करणारे दैवत आहेत. मंडळांच्या कार्यकर्त्यांनी कुठल्याही दबावाखाली न येता, उत्सवादरम्यान भाविकांना, वाहतुकीला अथवा कोणालाही कसलाही त्रास किंवा विघ्न होणार नाही याची नैतिक दक्षता घ्यावी. पोलीस आणि पालिकेचे कर्मचारी जर आपल्या सुरक्षेसाठी ४८ तास रस्त्यावर डोळ्यांत तेल घालून उभे राहत असतील, तर त्यांना सहकार्य करणे आपलेही कर्तव्य आहे. हा उत्सव केवळ दिखाऊपणा किंवा अवाजवी उंचीच्या अस्वस्थ स्पर्धेत न अडकवता, तो खऱ्या अर्थाने, मूळ भावनेने आणि मानवी सुरक्षेचे भान ठेवून साजरा करावा, हीच प्रत्येक कार्यकर्त्याला नम्र विनंती आहे.''

भविष्यात असे धोके कायमचे टाळण्यासाठी पोलीस प्रशासन, महानगरपालिका व वीज वितरण विभागाने एकाच टेबलवर एकत्र बसून ठोस नियमावली तयार करणे अत्यावश्यक आहे.

ध्वनी प्रदूषणासह मोकळ्या जागा व सार्वजनिक रस्त्यांवर मंडप उभारणीबाबत सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे तंतोतंत पालन व्हायलाच हवे.

त्याचप्रमाणे, वाहतुकीचा प्रचंड खोळंबा टाळण्यासाठी आर. पी. रोडऐवजी आझाद मैदानासारख्या प्रशस्त जागेला प्रशासनाने प्राधान्य द्यावे, असाही सूर उमटत आहे. प्रशासनाने आणि गणेश महासंघाने समन्वय साधून ज्या मंडळांनी यंदा अतिउंच मूर्तींची प्रतिष्ठापना केली होती, त्या सर्व मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची आगामी दुर्गोत्सव सुरू होण्यापूर्वीच तातडीची बैठक बोलवावी. या बैठकीत केवळ गणेशोत्सवच नव्हे, तर दुर्गोत्सवातही मूर्तींची उंची किमान ठेवण्याचे आवाहन करण्यात यावे.

# ज्ञानदेव जाधव यांचे निधन

**जालना -प्रतिनिधी**

दैनिक दुनियादारीचे अकाउंटंट ज्ञानदेव बाबासाहेब जाधव (वय ६२ वर्ष) यांचे आज रविवारी दि. २७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.



त्यांच्या पश्चात पत्नी आणि एक मुलगा असा परिवार आहे. ते ह. भ. प. प्रशांत महाराज जाधव यांचे वडील होते. त्यांच्या पार्थिवावर आज रात्री १०.३० वाजता रामतीर्थ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# गणेशोत्सवात 'आरोग्याचा श्रीगणेशा'; कोळेगावात १५० ग्रामस्थांची आरोग्य तपासणी

## *माझं गाव आरोग्यसंपन्न गाव अभियानांतर्गत आरोग्य तपासणी शिबिर; बीपी, शुगर तपासणीसह औषधांचे वितरण*

**भोकरदन । प्रतिनिधी**

'माझं गाव आरोग्यसंपन्न गाव' अभियान तसेच श्री गणेशोत्सवानिमित्त कोळेगाव, ता. भोकरदन, जि. जालना येथे 'आरोग्याचा श्रीगणेशा' या उपक्रमांतर्गत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. २४ सप्टेंबर २०२६ रोजी उपकेंद्र वालसा अंतर्गत भैरवनाथ गणेश मंडळाच्या वतीने आयोजित या शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिबिरात गावातील महिला, पुरुष तसेच इतर ग्रामस्थांची विविध प्रकारची आरोग्य तपासणी करण्यात आली. यामध्ये विशेषतः रक्तदाब () आणि रक्तातील साखरेची (शुगर) तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान आवश्यकतेनुसार ग्रामस्थांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले, तसेच गरजेनुसार औषधांचे वितरण करण्यात आले.

या शिबिरात एकूण १५० रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर धार्मिक उपक्रमासोबतच आरोग्यविषयक जनजागृती आणि तपासणीचा उपक्रम राबविण्यात आल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. शिबिरासाठी पिंपळगाव रेणुकाई आरोग्य केंद्राचे डॉक्टर बारेला, वैद्यकीय अधिकारी डॉ. सिद्दिकी, समुदाय आरोग्य अधिकारी श्री. मिसाळ आणि सुपरवायझर डॉ. पोटे यांनी मार्गदर्शन केले. तसेच आशा वर्कर मनीषा सुरडकर यांनी आरोग्य तपासणी व शिबिराच्या आयोजनात सहभाग घेतला. यावेळी भैरवनाथ गणेश मंडळाचे अध्यक्ष, सचिव व सदस्य, तसेच गावातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. गणेशोत्सवाच्या माध्यमातून आरोग्याचा संदेश देत ग्रामस्थांच्या आरोग्य तपासणीला प्राधान्य देण्याचा हा उपक्रम ठरला.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.